## प्रेस नोट

जळगाव दि.०९.१२.२०२५

सुरेश पवार, पोलीस हवालदार, नेम निंभोरा पोलीस स्टेशन जिल्हा जळगांव यांचेविरूध्द लाचमागणी प्रकरणी कारवाई केले बाबत

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| फिर्यादी | स्मिता दत्तात्रेय नवघरे, वय ३७ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव |
| आलोसे | सुरेश पवार, पोलीस हवालदार, नेमणूक- निंभोरा पोलीस स्टेशन, जिल्हा जळगाव |
| पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक | रावेर पोलीस स्टेशन जि.जळगाव गु.र.नं.४९५/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| लाचेची मागणी रक्कम | २०,०००/— रूपये |
| स्विकारली रक्कम | निरंक |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांनी शेतकरी यांच्याकडून एक लाख २७ हजार रुपये किमतीचा केळीचा माल घेऊन तो दिल्ली येथील व्यापारी यांना विकला होता परंतु सदर मालाचे पैसे शेतकऱ्यांना दिले नाही म्हणून त्यांनी तक्रारदार यांचे विरुद्ध तक्रार अर्ज केला होता त्याप्रमाणे आलोसे यांनी तक्रारदार यांना तक्रार अर्जाची चौकशी कामे निंभोरा पोलीस स्टेशन येथे बोलवले होते परंतु आलोसे हे तक्रारदार यांच्याकडे तक्रार अर्जात नमूद केलेल्या रकमेच्या दहा टक्के प्रमाणे लाच रक्कम मागितली अशी अशी तक्रार दि.०७/१०/२०२५ रोजी ला प्र वि जळगांव विभागाकडे दिली होती.<br><br>तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.०७/१०/२०२५ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता यातील आलोसे यांनी तक्रारदार यांच्या विरुद्ध दाखल अर्ज चौकशीमध्ये गुन्हा नोंद न करण्यासाठी त्यांना अर्ज चौकशी कामी योग्य ती मदत करण्याची मोबदल्यात आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे निंबोरा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना पैसे द्यावे लागतील असे सांगून २०,०००/— रुपये लाचेची मागणी केली आहे. म्हणून त्यांचे विरुद्ध वर प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा कारवाई | **पर्यवेक्षण अधिकारी** — श्री योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.जळगांव<br>**सापळा अधिकारी** — स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | **सापळा पथक** – स.फौज.दिनेशसिंग पाटील, पोहेकॉ/किशोर महाजन, मपोहेकॉ/संगीता पवार, पोकॉ/राकेश दुसाने, पोकॉ/अमोल सुर्यवंशी, पोकॉ/भुषण पाटील सर्व नेम.ला.प्र.वि.जळगाव.<br>**तपास अधिकारी** – श्री योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.जळगांव |
| मार्गदर्शन | १) **मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेड्डी,अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आहवान करण्यात येते की,भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक परिक्षेत्र नाशिक येथे सपंर्क करावा.

सपंर्क पत्ता :– ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक

संकेतस्थळ :– acbmaharastra.gov.in

ई मेल/ऑनलाईन तक्रार :– spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com

टोल फ्रि क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२५७–२२३५४७७

व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक :– ७५८८६६१०६४

योगेश जी. ठाकुर
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

Scanned with OKEN Scanner